Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# मूल्य शिक्षणाचा अभाव असणाऱ्या विद्यार्थ्यांवर संस्कार कथा प्रकल्पाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे

संशोधकाचे नाव
श्रीम. वृषाली जगन्नाथ जाधव
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
डॉ. भागवत भड
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

***सारांश:-***

***मानवी जीवन म्हणजे संस्कारांचा संचय असून ही संस्कार क्षमता व्यक्तीला अनेक ठिकाणाहून प्राप्त होत असते आणि शिक्षणातून. संस्कारक्षमता मिळण्याची शक्यता जास्त असते. जीवनमूल्यांचे संवर्धन हाही शिक्षणाचा एक अर्थ आहे. मूल्यशिक्षण म्हणजे सर्वांगीण विकासाचा आधार होय. शिक्षणाची व्यवस्था ही व्यक्तीला परिपूर्ण मानव बनविण्यासाठी केली जाते. शिक्षित व्यक्तीमध्ये मानवता हा गुण असलाच पाहिजे. या गुणाची निर्मिती मूल्यशिक्षणाच्या माध्यमातून करता येते शिक्षण हे मानवाला वळण देत असतानाच समाज परिवर्तनासाठी प्रयत्नशील असते आपल्या भारत देशाने ज्ञान विज्ञानाच्या विविध क्षेत्रात संतोषजनक प्रगती केली आहे. आपल्या साहित्य-कारांचे साहित्य संशोधकाचे संशोधन कला व चिकित्सा सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका इ. प्रत्येक क्षेत्रातील प्रगती ही प्रशंसनीय आहे. आपल्या देशांच्या सर्वांगीण प्रगतीवर गर्व वाटतो पण आपण ज्या वेगाने आपल्या शाश्वत मूल्यांवरील असलेला विश्वास संपवित चाललो आहोत व मूर्त जीवनाला सुखी करण्यासाठी जीवापाड प्रयत्न करीत आहोत ते सर्व प्रयत्न एका असुरक्षित भविष्याचे लक्षण आहे. आपले आजचे शिक्षक राजनैतिक सदस्य,अधिकारी,कर्मचारी सर्वच या मूल्य नाशाच्या संकटातून जात आहेत. काही मूल्यांना आपण ग्राह्य धरून देखील आत्मसात करू शकत नाही पण आपण मूल्ये आत्मसात केली असल्याचा देखावा करतो.एकीकडे मूल्यांबद्दल लोकांना रस वाटतो तर दुसरीकडे सर्वत्र अनाचार काळा बाजार,स्वार्थांधता,पाशवी वृत्ती पराकोटीला जाऊन भिडलेली आहे.मूल्यांबद्दल बोलायचे झाल्यास ते फक्त भाषणापुरतेच मर्यादित राहिले आहे.देशातील तरुणांनी कोणत्या आदर्श जीवनाकडे पहावे?अशी परिस्थिती आहे.जथे मूल्यच नाहीत तेथे जीवन आदर्श होणार तरी कसे?संस्कारासाठी व मूल्य विकासासाठी शालेय शिक्षणाशिवाय आता पर्याय नाही.मूल्य शिक्षणच सर्वांना तारक ठरणार आहे. म्हणूनच संशोधकाने संशोधनासाठी मूल्य शिक्षणाचा अभाव असणाऱ्या विद्यार्थ्यांवर संस्कार कथांचा होणारा परिणाम हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.***

*Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्त्वाचे शब्द** – विद्यार्थी, मूल्य शिक्षण, संस्कार

**विद्यार्थी ही संकल्पना :-**

विद्यार्थी ही संकल्पना शिक्षणप्रक्रियेतील एक महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या व्यक्तीशी संबंधित आहे.

विद्यार्थी म्हणजे ती व्यक्ती जी ज्ञान,कौशल्ये आणि मूल्ये आत्मसात करण्यासाठी औपचारिक किंवा अनौपचारिक शिक्षण घेत असते. शाळा महाविद्यालय विद्यापीठ किंवा कोणतीही शिक्षणसंस्था असो तेथे शिकणाऱ्या प्रत्येकाला आपण विद्यार्थी म्हणतो.

कोणतीही गोष्ट शिकत असलेल्या व्यक्तीला विद्‌यार्थी म्हणतात.

विद्यार्थी या शब्दाची फोड - विदया + अर्थी

मूल्य शिक्षण संकल्पना-:

संविधानाने जी दहा मूल्ये ठरवून दिलेली आहेत. त्यांचे शिक्षण म्हणजेच मूल्य शिक्षण होय. विदयार्थ्यांमध्ये संस्कार रुजविणे विदयार्थ्योंमध्ये मूल्ये रुजविणे.

**संस्कार-:**

विदयार्थ्यांचा मानसिक व भावनिक विकास योग्य प्रकारे होण्यासाठी त्यामध्ये आवश्यक असणारे गुण म्हणजेच मूल्ये व ते आत्मसात होण्यासाठी देण्यात येणार शिक्षण म्हणजे संस्कार होय.

**संशोधन विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

१९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचार केल्यास स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपल्या कारकीर्दीत हे नवे धोरण जाहीर केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ शैक्षणिक आव्हानाकडून कृती कार्यक्रमाकडे या शीर्षकाखाली महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी प्रसिध्द केले आहे. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील प्रमुख बाबींमध्ये मूल्यांच्या शिक्षणाबाबतीत जागरूकता आवश्यक आहे असे नमूद केले आहे. आजच्या मूल्यांचा ऱ्हास विचारात घेऊन सामाजिक व नैतिक मूल्ये रुजविण्याचे शिक्षण हे साधन समजून अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे असे स्पष्ट केले. ऐक्यासाठी वैश्विक व शाश्वत मूल्यांना उत्तेजन देऊन गुढवाद धर्मवेड हिंसा लोकभ्रम व दैववाद कमी कमी केला पाहिजे असे सांगितले. शिक्षणाचा आशय आणि शैक्षणीक प्रक्रिया यांचा पुनर्विचार करून मूल्यशिक्षणाची कल्पना विस्ताराने सांगितली आहे व विदयार्थ्यांचा नैतिक व भावनिक विकास यावर भर दिला आहे.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने भारतीय परिस्थितीचा सखोल अभ्यास करून भारतासारख्या अनेक धर्म असलेल्या समाजामध्ये धार्मिक शिक्षण देणे शक्य नाही म्हणून नैतिक शिक्षणाला व्यापक अर्थ देऊन मूल्यशिक्षणाची संकल्पना समोर आणली.यात विदयार्थ्यांचा ज्ञानात्मक,भावात्मक,क्रियात्मक,अध्ययन पातळ्या उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून हे जाणीवपूर्वक संस्कार औपचारिक शिक्षण पध्दतीतून दिले जाऊ शकतात यासाठी शालेय माध्यम निवडले असून अभ्यासक्रम हे साधन म्हणून वापरावे लागते आतापर्यंत आपण विविध काळात विविध प्रकारच्या शिक्षण प्रणालीतून मूल्य शिक्षणाचा विकास कसा होत गेला हे पाहिले.प्रत्येक समितीने व आयोगाने मूल्य शिक्षणासंबंधी व्यक्त केलेल्या अपेक्षा आणि शिफारशीचा विचार केला. यावरून एक गोष्ट तर सूर्यप्रकाशा इतकीच स्वच्छ आहे की मनुष्याचा उत्कर्ष नैतिक मूल्यांवरच अवलंबून असतो. या सर्व गोष्टींचा विचार करून मूल्य शिक्षणाचा अभाव असणाऱ्या विद्यार्थ्यांवर संस्कार कथांचा होणारा परिणाम अभ्यासणे हा विषय संशोधनासाठी घेण्यात आला.

संशोधन विषयाची सद्यस्थिती-:

शाळेतील सर्वच मुलांचा सर्वांगिण विकास करणे हे शिक्षणाचे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. यासाठी दर्जेदार शिक्षणा बरोबरच इतर पुरक अभ्यासक्रमाद्वारे अनौपचारिक शिक्षणही खूप महत्वाचे आहे. औपचारिक व अनौपचारिक दोन्ही प्रकारच्या शिक्षणानेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजे बौध्दिक,शारीरिक व मानसिक तसेच भावनिक विकास साधण्यासाठी उपयोग करता येतो. परंतु आजची शिक्षण पध्दती त्या कामी कुठेतरी कमी पडत असल्यासारखे वाटले. शिक्षणाने विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन सुजाण नागरिक तयार होणे गरजेचे असते. या उद्देशाने अभ्यासक्रमान मूल्य शिक्षणाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. अलीकडच्या धकाधकीच्या काळात यांत्रिकीकरण झपाट्याने वाढत आहे माणूस माणसापासून दुरावत आहे. त्यामूळे आज माणसाला अनेक समस्याना तोंड द्यावे लागत आहे.शालेय विद्यार्थी देखील वर्गात किंवा शाळेत वागताना मूल्यांचा अभाव असलेले वर्तन करताना दिसतात. किशोरावस्थेतील या मुलांना योग्य मार्गदर्शन लाभले तर ते भविष्यात समाजात वागताना चांगल्या पध्दतीने वागतील अशी खात्री वाटते. त्यासाठी वर्गपातळीवर काही उपक्रम राबविणे गरजेचे आहे का? हे जाणून होणे महत्वाचे आहे. वृत्तपत्रे व समाजमाध्यमातून ऐकावयास पहावयास मिळालेल्या माहितीचा आढावा घेऊन असे लक्षात येते की मूल्यशिक्षण कार्यक्रम विकसनाची खूप गरज आहे.

समारोप -

थोडक्यात असे म्हणता येईल की शालेय जीवनात अभ्यासाबरोबरच मूल्य शिक्षण देणे ही काळाची गरज

आहे. एक संस्कारी सुजाण नागरिकच देशाचे भवितव्य चांगले घडवू शकतो. मानवता हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे असे म्हटले जाते. उत्तम प्रकारे मूल्य संस्कार झालेला विद्यार्थीच राष्ट्राचा विकास करू शकतो.

संदर्भसूची-

1. बर्वे बी.एन.(२०१६) 'ताण आणि आरोग्य'-विद्या प्रकाशन,नागपूर
2. मराठे राम,(ऑगस्ट २००८)'असे घउवा मुलांचे व्यक्तिमत्त्व'-मेहता पब्लिकेशन,पुणे.
3. सोहनी अनुराधा,भिडे माधुरी,(मार्च २००६) 'आपली मुले का बिघडतात'-उमेष प्रकाशन पुणे.